**<u>ठळक बातम्या</u>**

- आंदोलक विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिसांच्या कारवाईसह अनेक मुद्द्यांवरून विरोधकांचा संसदेत आजही गदारोळ/ लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- करनिर्धारण आणि इतर कायदे दुरुस्ती विधेयकाला संसदेची मंजुरी

- राम मंदिर देणगी अपहार प्रकरणातल्या सर्व ८ आरोपींच्या न्यायालयीन कोठडीत २४ ऑगस्टपर्यंत वाढ

**आणि**

- गडचिरोली जिल्ह्यातल्या अनुदानित आश्रमशाळेत ६ विद्यार्थिनींना सर्पदंश, तीन जणींचा मृत्यू

**<><><><><>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या चौथ्या आणि अंतिम आठवड्याला आजपासून सुरुवात झाली. मात्र, नीट पेपरफुटीबाबत आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिसांच्या कारवाईसह अनेक मुद्द्यांवरून विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे संसदेच्या कामकाजात आजही वारंवार अडथळे आले. हा गदारोळ सुरू राहिल्यामुळे लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

**<><><><><>**

कर आकारणी आणि इतर कायदे, सुधारणा विधेयक, २०२६ आज संसदेनं मंजूर केलं. राज्यसभेनं चर्चेनंतर हे विधेयक लोकसभेकडे परत पाठवलं. लोकसभेनं हे विधेयक यापूर्वीच मंजूर केलं होतं. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी हे विधेयक मांडलं होतं. या विधेयकाद्वारे 'पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टिम्स ॲक्ट, २००७', 'आयकर कायदा, २०२५' आणि 'वित्त कायदा, २०२६' यामध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव आहे. चर्चेला उत्तर देताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितलं की, बाह्य आर्थिक धक्क्यांचा प्रभाव कमी करणं, देशांतर्गत अर्थव्यवस्थेत स्थिरता सुनिश्चित करणं आणि सध्याच्या जागतिक परिस्थितीमुळे प्रभावित झालेल्या प्रमुख क्षेत्रांना आधार देणं, हा या विधेयकाचा उद्देश आहे. याव्यतिरिक्त, या विधेयकाद्वारे परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार आणि 'बँक फॉर इंटरनॅशनल सेटलमेंट्स' यांना

सरकारी रोख्यांमधील गुंतवणुकीवर मिळणाऱ्या व्याजावर आयकर भरण्यापासून सूट मिळेल. तसंच या विधेयकाद्वारे यूपीआय वापरकर्त्यांवर कोणताही कर किंवा व्यवहार शुल्क लादले जाणार नाही आणि इलेक्ट्रॉनिक पेमेंट पद्धतींना शुल्काबाबतचं कायदेशीर संरक्षण यापुढंही मिळत राहील.

**<><><><>**

न्यायाधिकरण सुधारणा विधेयक 2026 आज लोकसभेत मंजूर झालं. विविध न्यायाधिकरणमधले सदस्य आणि अध्यक्षांच्या नेमनणुका, प्रशासन आणि कारभारात पारदर्शिता, आणि सक्षमता आणि सुधारणा तसंच, स्वतंत्र पणाची खातरजमा करणं हे या विधेयकाचं उद्दीष्ट आहे. राष्ट्रीय न्यायाधिकरण आयोग नेमण्याचा प्रस्तावही या विधेयकात समाविष्ट आहे. या कायद्याद्वारे 'राष्ट्रीय न्यायाधिकरण आयोग' स्थापन करण्याचा प्रस्तावही यात आहे.

**<><><><>**

पेट्रोलमध्ये इथेनॉलचं मिश्रण २० टक्क्यांपेक्षा जास्त वाढवण्याबाबत सरकारनं कोणताही निर्णय घेतलेला नाही, अशी माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी राज्यसभेतील एका प्रश्नाला लेखी उत्तर देताना दिली. इथेनॉलच्या अधिक मिश्रणाबाबतचा कोणताही भविष्यातला निर्णय हा सविस्तर वैज्ञानिक आणि तांत्रिक अभ्यास तसंच, वाहन उत्पादक आणि तेल विपणन कंपन्यांसह, अन्य घटकांशी सल्लामसलत केल्यानंतरच घेतला जाईल, मात्र प्रत्यक्ष वापराच्या अनुभवावरून 'E-20' इंधनामुळे वाहनांच्या कामगिरीवर कोणताही व्यापक प्रतिकूल परिणाम होत असल्याचं दिसून आलेलं नाही, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

२०४७मध्ये विकसित भारताचं स्वप्न साकार करायचं असेल, तर छोट्या गोष्टींमध्ये, जाती-धर्माच्या भेदांमध्ये अडकून चालणार नाही, तर एकत्र चालायचा मंत्र अंगिकारायला हवा, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे. वरळीत आज त्यांच्या उपस्थितीत तिरंगा यात्रा काढण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. ज्या तिरंग्यासाठी क्रांतिकारक फासावर गेले, सैनिकांनी सीमेवर मरण पत्करलं, भारतवासीयांनी मोठा संघर्ष केला, तो तिरंगा आकाशात चंद्र-सूर्य असेपर्यंत खाली उतरणार नाही, असं ते म्हणाले.

***होल्ड... बाईट- देवेंद्र फडनवीस***

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष, मुंबई भाजपाचे अध्यक्ष अमित साटम, मंत्री मंगलप्रभात लोढा, आशीष शेलार, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुंबईच्या महापौर रितू तावडे यांच्यासह इतर यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांनी आज नागपूरमध्ये तिरंगा वंदे मातरम प्रदर्शनाचं आणि नागपूर महानगरपालिकेच्या तिरंगा यात्रा स्टॉलचं उद्घाटन केलं.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सहा खासदारांच्या शिवसेना प्रवेशाला मान्यता देण्याच्या लोकसभा सभापतींच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवरची सुनावणी सभापती ओम बिर्ला हजर न राहिल्यानं सर्वोच्च न्यायालयानं २ आठवडे पुढे ढकलली आहे. न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या पीठानं या प्रकरणी २२ जून रोजी नोटिसा जारी केल्या होत्या.

**<><><><><>**

राम मंदिर देणगी अपहार प्रकरणातल्या सर्व ८ आरोपींची न्यायालयीन कोठडी भ्रष्टाचार विरोधी विशेष न्यायालयानं २४ ऑगस्टपर्यंत वाढवली आहे. पोलिसांनी सर्व आरोपींची त्यांच्या पोलीस कोठडीच्या काळात स्वतंत्र चौकशी केली आहे.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यातल्या धानोरा तालुक्यात जपतलाई इथल्या अनुदानित आश्रमशाळेत काल रात्री विषारी सापाच्या दंशामुळे तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाला. तर चिंताजनक प्रकृती असलेल्या एका विद्यार्थिनीला पुढील उपचारासाठी हेलिकॉप्टरनं नागपूरला हलवलं आहे. इतर २ जणींवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून इतर १५ जणींना निरीक्षणाखाली ठेवल्याचं डॉक्टरांनी सांगितलं. या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येणार असल्याचं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं. तसंच जखमी विद्यार्थिंनींच्या उपचारात कुठलीही कमतरता न ठेवण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

**<><><><><>**

अमेरिका जोपर्यंत इराणविरुद्धची नौदलाची नाकेबंदी हटवत नाही, तोपर्यंत होर्मुझची सामुद्रधुनी खुली होणार नाही, असं इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते एस्माइल बकेकी यांनी

आज स्पष्ट केलं. अमेरिका आणि इस्रायलनं इराणविरोधात केलेल्या लष्करी कारवाईमुळे ही सामुद्रधुनी बंद करण्यात आली होती, आणि आता हे दोन्ही देश इराणवर काय अटी लादतात, यावर ती पुन्हा उघडणार की नाही, हे अवलंबून आहे, असं त्यांनी तेहरान इथं वार्ताहर परिषदेत सांगितलं.

इराण आणि ओमान यांच्यात एका जलमार्गासाठी सुरू असलेली चर्चा हा द्विपक्षीय विषय आहे, असंही ते म्हणाले.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या तब्बल ८६ हजार कर्मचाऱ्यांचे जुलै महिन्याचं वेतन उद्या, ११ ऑगस्ट रोजी त्यांच्या बँक खात्यात जमा होईल, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी आज दिली.

दर महिन्याच्या ७ तारखेला अदा होणारं या कर्मचाऱ्यांचं वेतन प्रशासकीय दिरंगाई आणि सलग आलेल्या सुट्ट्यांमुळे यंदा काहीसं लांबलं. त्यामुळे सरनाईक यांनी राजशिष्टाचार बाजूला ठेवून थेट वित्त विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी वारंवार संवाद साधला. त्यांच्या पाठपुराव्यामुळे प्रतिपूर्ती रकमेबाबतचा शासन निर्णय आज प्राप्त झाला असून, उद्या वेतन जमा होणार आहे.

यापुढं वेतन अदा करण्यात कोणत्याही प्रकारचा विलंब होता कामा नये, अशा स्पष्ट सूचना सरनाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

<><><><><>

झारखंडमध्ये भरती परीक्षांमधल्या कथित गैरव्यवहारांविरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आज विधानसभेला घेराव घातला. बॅरिकेड्स ओलांडण्याचा प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी पाण्याचे फवारे, लाठीमार, अश्रुधुराच्या नळकांड्यांचा वापर केल्याने तणाव निर्माण झाला. काही आंदोलकांनी पोलिसांवर दगडफेक केल्यानंतर बळाचा वापर झाल्याचा दावा पोलिसांनी केला. विद्यार्थ्यांनी शांतता राखावी, असं आवाहन पोलीस अधिकाऱ्यांनी केलं आहे. काही परीक्षा रद्द कराव्यात आणि कथित गैरप्रकारांची चौकशी सीबीआयमार्फत करावी, अशी विद्यार्थ्यांची मागणी आहे. दरम्यान, झारखंड लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष एल. खैंगटे यांनाही अटक करण्यात आली आहे.

<><><><><>

पश्चिम कोलंबिया आणि इक्वादोरला आज ७ पूर्णांक ४ दशांश रिख्टर स्केलच्या शक्तिशाली भूकंपाचा धक्का बसला. या भूकंपाचं केंद्र सॅन होजे देल पल्मार इथं, भूगर्भात ६६ मैल खोल असल्याचं कोलंबिया आणि अमेरिकेच्या भूगर्भशास्त्र सर्वेक्षण विभागानं सांगितलं. या भूकंपात अनेकजण जखमी झाल्याची आणि इमारतींचं मोठं नुकसान झाल्याची माहिती चोकोचे गव्हर्नर नुबिया कोर्डोबा यांनी दिली.

//<><><><><>//